ಮಾರ್ಚ್/ಏಪ್ರಿಲ್ 2025 ರ ಪರೀಕ್ಷೆ-1

**MARCH/APRIL 2025 EXAMINATION-1**

**A**

**CCE RF/RR/PF/PR**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 12

[ Total No. of Printed Pages : 12

[ ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 45

[ Total No. of Questions : 45

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**(ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿ/ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ/ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ/ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ)**

**( Regular Fresh / Regular Repeater / Private Fresh / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 21. 03. 2025 ] [ Date : 21. 03. 2025

ಸಮಯ : ಬೆಳಗ್ಗೆ 10-00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-15 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-00 A.M. to 1-15 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

**Cut here/ಇಲ್ಲಿ ಕತ್ತರಿಸಿ**

1. प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नपत्रिका ही विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती प्रश्नपत्रिका उघडावयाची आहे. **(बाणाने दर्शविलेल्या ठिकाणातून प्रश्नपत्रिका कापून उघडा.)** डाव्या बाजूने कापून प्रश्नपत्रिका उघडू नका. प्रश्नपत्रिकेमधील सर्व प्रश्न असलेली पाने व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पहा.
3. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या ही त्या प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शविते.
5. प्रश्नांची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.
6. तुम्हाला देण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) आणि तुमच्या प्रवेशपत्रावर छापलेल्या प्रश्नपत्रिकेची आवृत्ती (version) दोन्ही एकच आहेत. याची खात्री करुन घ्या.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्नपत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** **6 × 1 = 6**

1. 'मनोरंजन' या शब्दाचा संधीविग्रह असा होतो –

(अ) मनो + रंजन (ब) मना + रंजन

(क) मन्य + रंजन (ड) मनः + रंजन

2. ''सत्ता, संपत्ती गेली तरी माणसाचा ताठा कायम राहणे'' या आशयाशी जुळणारी म्हण ही आहे –

(अ) गरज सरो वैद्य मरो.

(ब) गर्जेल तो पडेल काय.

(क) सुंभ जळाला तरी पीळ जळत नाही.

(ड) घरोघरी मातीच्या चुली.

3. ''काडीला लावलेला बर्फाचा गोड गोळा'' या शब्दसमूहासाठी एक योग्य शब्द हा आहे –

(अ) लॉलीपॉप (ब) कुल्फी

(क) सरबत (ड) चॉकलेट

4. नामाबद्दल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती मर्यादित करणारा शब्द म्हणजे –

(अ) नाम (ब) सर्वनाम

(क) विशेषण (ड) क्रियापद

5. 'पंतोजी' या शब्दाचा समानार्थी शब्द हा आहे –

(अ) वैद्य (ब) पद्मनाभ

(क) तनय (ड) आचार्य

6. 'उद्योगी' शब्दाचा विरुद्धार्थी शब्द हा आहे –

(अ) कामसू (ब) उद्योगपती

(क) निरुद्योगी (ड) संत

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :**

**4 × 1 = 4**

7. षष्ठी विभक्ती : चा, ची, चे :: सप्तमी : ..................

8. तो गाणे गातो : कर्तरी प्रयोग :: अमेयने व्यायाम केला : ..................

9. मी निबंध लिहिला आहे : वर्तमानकाळ :: सगळेच सहलीला जातील : ..................

10. पंचवटी : द्विगू समास :: कांदेपोहे : ..................

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7**

11. आईने थळोबास कोणता नवस केला ?

12. आक्का अण्णाला रोज वैतागून काय म्हणत असे ?

13. बेळगावी काँग्रेस अधिवेशनात व्यासपीठावर कोण–कोण बडी मंडळी बसली होती ?

14. ज्ञानेश्वरांच्या ओवीचा गौरव कोणत्या शब्दात केला जातो ?

15. विरहिणी म्हणजे काय ?

16. पावसाने झोडपल्यावर गुराखी कोठे उभा राहतो ?

17. 'नेनंता गुराखी' कवितेचा काव्यप्रकार कोणता ?

**IV.** **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(अ) गहाण टाकणे.

(ब) पांग फिटणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे सांगा.

आला हा दारि उभा वसंत फेरीवाला,

पोते खांद्यावरी सौद्याचे । देईल ज्याचे त्याला.

20. गण पाडून वृत्त ओळखा.

'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे.'

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14**

21. चिं. वि. जोशी यांचा परिचय लिहा.

22. ''ये आदिवासी कभी नहीं बदलेगा'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

23. वाटणीच्या घोळाने घरातील परिस्थिती कशी झाली होती ?

24. गंगूबाईंना कोणकोणते पुरस्कार आणि उपाधींनी सन्मानित करण्यात आले ?

25. ''ही बार-बार तलवार येईल का पुन्हा'' संदर्भासह स्पष्टीकरण करा.

26. सगळे ऋतू ग्रामीण स्त्रियांसाठी काय आणतात ?

27. विंदा करंदीकर यांचा परिचय लिहा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3**

28. (अ) वृक्षवल्ली आम्हा सोयरी.

**किंवा**

(ब) मरावे परी कीर्तीरूपे उरावे.

**VII. खालील प्रश्नांची पाच–सहा वाक्यात उत्तरे लिहा : 10 × 3 = 30**

29. 'अनंतशक्तिः परमेश्वरू' या पाठातील आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन कसे केले आहे ?

30. किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी कोणत्या सरदारांनी कसे प्रयत्न केले ?

31. डॉ. आंबेडकरांचे पहिले दैवत कोणते ? त्याबद्दल ते काय सांगतात ?

32. पावसाळ्याचा हिशेब अनंत काणेकरांनी कसा घातला आहे ?

33. चाफ्याच्या झाडाला गुलजारांनी काय म्हटले आहे ? त्याची गंमत कोणती ?

34. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

35. पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते सांगा ?

36. मार्कंडेयाची तुलना कविने देशभक्तांशी का केली आहे ?

37. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण–कोण व कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

38. 'धरण' कवितेतील स्त्री गरीब आहे हे स्पष्ट करा.

**VIII. खालील प्रश्नांची आठ–दहा वाक्यात उत्तरे लिहा :** **4 × 4 = 16**

39. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

**किंवा**

'जपानी स्त्री' यावर टीप लिहा.

40. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांच्या प्रतिक्रिया कशा होत्या ?

**किंवा**

टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणकोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

41. 'सत्कार' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

या भारतात बंधुभाव ............................

................................................

................................................

.......................... सकलामाजी वसू दे.

**किंवा**

सकलास कळो ................................

..............................................

..............................................

................................ नष्ट हो जगातून.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**1 × 4 = 4**

**( 2 + 2 )**

43. एकदा नेहरूकाका सुरक्षा रक्षकांचा डोळा चुकवून बाहेर गेले. पंतप्रधान घरात नाहीत असे दिसले तेव्हा सर्वत्र शोधाशोध सुरू झाली; पण पंतप्रधानांचा पत्ता लागला नाही. शेवटी एके ठिकाणी ते सापडले. कुठे म्हणाल, तर दिल्लीत एके ठिकाणी मुलांचा मेळावा भरला होता त्या मेळाव्यात !

त्या मेळाव्यातील मुलांनी चाचा नेहरूंना गाणे म्हणण्याचा आग्रह केला. ते म्हणाले, ''मला गाणे येत नाही.'' परंतु मुलांच्या आग्रहास्तव त्यांनी मुलांना सांगितले, ''मी गाणे म्हणून दाखवतो पण मी करीन ते तुम्ही करून दाखवले पाहिजे.'' मुलांनी अट मान्य केली तेव्हा नेहरूकाकांनी चक्क शीर्षासन केले. मुलांनी शीर्षासन करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना ते जमले नाही आणि नेहरूकाका गाणे म्हणण्याच्या दिव्यातून सुटले.

**प्रश्न :**

(अ) सुरक्षा रक्षकांचा डोळा चुकवून गेलेली व्यक्ती कशी मिळाली ?

(ब) नेहरूकाका गाणे म्हणण्याच्या दिव्यातून कसे सुटले ?

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5**

44. व्यायामाचे महत्त्व पटवून देणारे पत्र धाकट्या भावाला लिहा.

**किंवा**

बहिणीचे लग्न असल्यामुळे चार दिवस शाळेला येऊ शकणार नाही. यासाठी मुख्याध्यापकांना रजेचा अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. (अ) माझा आवडता समाजसुधारक.

(ब) मराठी असे आमुची मायबोली.

DO NOT WRITE ANYTHING HERE